व्यवसायीक दावा क्रमांक ०२/२०२३
नि.क्र.१९ लगत

**वादी तर्फे साक्षीदार क्र.०१**

**वादी यांचा पुढील उर्वरीत उलटतपास प्रतिवादी तर्फे वकिल श्री.जे.ए.जोशी यांच्यातर्फे फेर–शपथेवर सुरु** –

२३. प्रकल्प अहवालास मान्यता मिळविणे आणि मान्यता मिळेपर्यंत त्यावर काम करणे ही जबाबदारी वादीची आहे. हे म्हणणे खरे आहे की अहवालामध्ये तांत्रीक बाबीच्या अनुषंगाने त्रुटी निघाल्यास त्याची पुर्तता वादी संस्थने करावयाची आहे. वादीचे प्रथम पायरीचे काम म्हणजे संकल्पन प्रकल्प अहवाल तयार करुन, आरेखन तयार करुन त्यावर नगरपालिकेची मंजूरी घेणे. हे म्हणणे खरे आहे की त्या अहवालाच्या अनुषंगाने संबंधीत विभागाकडून तांत्रीक मान्यता घेण्याची जबाबदारी वादीची आहे. तांत्रीक मंजूरी हा शब्द करारात लिहिलेला आहे. करारामध्ये तांत्रीक मान्यता घेणे असे शब्द स्पष्टपणे नमुद नाही.

२४. हे म्हणणे खरे आहे की आवश्यक त्या मान्यता घेणेकरीता नगरपरिषदेकडील कागदपत्रे आणि आमच्याकडील कागदपत्रे याच्या संचिका घेवून संबंधित विभागाकडे वादीने जावे लागते. हे म्हणणे खरे आहे की त्या संबंधित संचिकाची अतिरीक्त प्रत वादीकडे असते. वादीने ज्या कामाच्या अनुषंगाने रकमेची मागणी केली आहे त्या कामाची वादीकडे असणारी अतिरीक्त संचिका किंवा त्याची प्रत न्यायालयात दाखल केलेली नाही.

२५. **प्रश्न** – प्रकल्प मंजूर झाल्याशिवाय प्रकल्प सल्लागार कंपनीला बिलाची रक्कम अदा करता येत नाही?

**उत्तर** – हे म्हणणे खरे नाही, करारनाम्यात ठरलेल्या टप्प्यानुसार बिलाची रक्कम दिली जाते.

२६. प्रतिवादीने दिनांक ३०.११.२०१७ रोजीचे पत्र दिले होते. त्या पत्रानंतर आठवडाभरात आम्ही अहवाल सादर केला. आम्ही सदर पत्रानुसार जो अहवाल सादर केला आहे, त्याची प्रत आमचेकडे उपलब्ध आहे. मी त्या अहवालाची प्रत न्यायालयात दाखल करावयास तयार आहे.

२७. हे म्हणणे खरे आहे की, सुवर्ण जयंती नगरोथ्थान अभियाना अंतर्गत

राहाता नगरपालिकेसाठी सात रस्त्यांचे काम मंजूर झाले होते. हे म्हणणे खरे नाही की नगरपालिकेने दिनांक ३०.११.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मागविलेला अहवाल आम्ही तात्काळ दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की रस्त्याचे मंजूरीचे काम हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठवावे लागते. आम्ही दाखल केलेल्या अहवालावर सार्वजनिक बांधकाम विभागाने सन २०१९ मध्ये त्रुटी काढल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की त्या त्रुटींची एक प्रत वादी संस्थेला दिली जाते. त्या त्रुटींची पुर्तता आम्ही लगेच केली, त्याचा निश्चित दिनांक, महिना, वर्ष मला सांगता येत नाही. मी वादी संस्थेकडील अभिलेख पाहून त्या बाबतचा दिनांक सांगू शकेल. हे म्हणणे खरे आहे की त्या त्रुटीची पुर्तता वादी संस्थेने मे २०२० मध्ये केली आहे. त्या त्रुटीची पुर्तता केल्यानंतर संचिका घेवून वादीला सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जावून तो पुर्तता अहवाल पुन्हा जमा करावा लागतो.

२८. हे म्हणणे खरे आहे की त्या नंतर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नाशिक येथील प्रादेशिक कार्यालयामधुन सुद्धा वादी संस्थेला मंजूरी आणण्याचे काम करावे लागते. हे म्हणणे खरे नाही की त्या कामामध्ये वादी संस्थेने उशीर केल्यामुळे त्या कामास संचालक नगरपरिषद प्रशासक विभाग मुंबई यांचेकडून मंजूरी मिळाली नाही. हे म्हणणे खरे आहे की सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नाशिक कार्यालयाने मंजूरी दिल्यानंतरही त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मुंबई येथील संचालक, नगरपरिषद प्रशासन विभाग यांनी त्रुटी काढल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की मुंबई येथील कार्यालयाने काढलेल्या सदर त्रुटींची पुर्तता करुन घेण्याची जबाबदारी ही वादी संस्थेची होती. त्या कार्यालयाने काढलेल्या त्रुटी आम्ही जाणून घेतल्या व त्या त्रुटीमध्ये असणा–या तात्रींक बाबीशी निगडीत त्रुटींची पुर्तता वादी संस्थेने केली आहे. मुंबई येथील कार्यालयाने काढलेल्या त्रुटीविषयीचे पत्र आणि त्या अनुषंगाने वादी संस्थेने केलेल्या पुर्तते बाबतचे पत्र आम्ही अभिलेखावर दाखल केले आहे.

२९. हे म्हणणे खरे आहे की वादी संस्थेला अहवालामध्ये खर्चाची रक्कम व ॲबस्ट्रॅक यामधील रकमा, सर्व रस्ते डीपी आहेत किंवा नाहीत याचे वर्णन, पेव्हमेंट चे डिजाईन आय.आर.सी. प्रमाणे, नविन रस्ते किती आहेत, अस्तित्वात रस्ते किती

आहेत, भुयारी गटार, पावसाळी गटार, गटारीचे डिझाईन, सेक्शन, लोकेशन व ट्रॅफिक सर्व्हे डिटेल  या सर्व बाबींचा  याचा उल्लेख करावा लागतो. ट्रॅफिक सर्व्हेचा अहवालाची प्रत आमचेकडे आहे. ती न्यायालयात दाखल करावयास अडचण नाही.

३०. **प्रश्न** – मुंबई कार्यालयाने दिलेले मंजूरीचे पत्र तुमच्याकडे उपलब्ध आहे का?

**उत्तर** – त्या मंजूरीच्या पत्राची प्रत आमच्या कडे उपलब्ध नाही.

३१. मुंबई कार्यालयाने काढलेल्या त्रुटी नंतर, तांत्रीक मंजूरी देण्यात आली हे दाखविण्याकरीता कागदोपत्री पुरावा वादी संस्थेकडे नाही. नगर संचालनालय मुंबई यांचेकडील दिनांक २८.०९.२०२० रोजीचे पत्रानंतर वादी संस्थने अहवाल नगरपालिका राहाता यांचेकडे जमा केला हे दाखविण्याकरीता कागदोपत्री पुरावा वादी संस्थेकडे उपलब्ध आहे. हे म्हणणे खरे आहे की तो पुरावा न्यायालयात दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की फेरप्रस्तावाला पुन्हा तांत्रीक मंजूरी घ्यावी लागते. आजच्या उलटतपासा दरम्यान कागदोपत्री पुराव्याचा संदर्भ देवून उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने संबंधित कागदोपत्री पुरावा मी दाखल करावयास तयार आहे.

**(वादी व प्रतिवादी यांचे विनंती वरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.....)**

**वाचून दाखविले, बरोबर आहे.**

श्रवणोत्तर स्विकृती

SAIFUDDIN BASHABHAI SHAIKH
Digitally signed by SAIFUDDIN BASHABHAI SHAIKH
Date: 2026.02.26 11:25:21 +0530

दिनांक – २५.०२.२०२६.

(सैफुद्दीन बा. शेख)

राहाता.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, राहाता.